असा. क्र. ४९ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

(३२)

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, फेब्रुवारी २६, २००४/फाल्गुन ७, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग चार-ब

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ फेब्रुवारी २००४

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००४/३८/प्र.क्र. ६८/म-१.—ज्याअर्थी,मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) (यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम " असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करणयात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महसूल व वन विभाग क्रमांक मुद्रांक. २००३/७४२/प्र.क्र. ३१७/म-१, दिनांक ३१ ऑक्टोबर २००३ हा आदेश काढला आहे; आणि त्याद्वारे " खाजगी क्षेत्राच्या सहभागामार्फत औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचा विकास " या नावाच्या धोरणाखाली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व खाजगी विकासक यामध्ये निष्पादित करावयाच्या, उक्त अधिनियमाच्या अनुसूची-एक मधील संलेख करार [अनुच्छेद ५ (ह)], विकास करार [अनुच्छेद ५ (ग-अ)], संयुक्त उपक्रम करार (अनुच्छेद ४७), मुखत्यारनामा [अनुच्छेद ४८ (अ) ते (इ)] आणि विकास करण्यासाठी दिलेला मुखत्यारनामा [अनुच्छेद ४८ (ग)] यावर उक्त अधिनियमान्वये आकारणी योग्य असलेल्या मुद्रांक शुल्कात सूट दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, यापुढे विवक्षित फेरबदलांसह मुद्रांक शुल्कात अशी सूट देणे, महाराष्ट्र शासनास इष्ट वाटत आहे ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९, खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे, अशी खात्री पटली असल्याने महाराष्ट्र शासन, याद्वारे, भाडेपट्टा (अनुच्छेद ३६), संमती व परवानगी करारनामा [अनुच्छेद ३६ (अ)], आणि भाडेपट्ट्याचे/अभिहस्तांकित भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०) याखालील खाजगी क्षेत्रांच्या सहभागामार्फत औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचा विकास या नावाच्या धोरणाखाली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व खाजगी विकासक यांच्यामध्ये निष्पादित करावयाच्या संलेखांवरील आकारणी योग्य मुद्रांक शुल्कांना सूट देण्यात येत आहे आणि याशिवाय याद्वारे, संयुक्त क्षेत्रातील कंपनी आणि बँक/वित्तीय संस्था यांच्यामध्ये निष्पादित करावयाच्या गहाणखत (वरील अनुसूचीमधील अनुच्छेद ४०), या संलेखावरील आकारणी योग्य मुद्रांक शुल्कात सूट देत आहे.

**स्पष्टीकरण.**——या आदेशाच्या प्रयोजनार्थ, ' खाजगी विकासक ' याचा अर्थ, औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचा विकास करण्याचे काम नेमून देण्यात आलेला आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने खाजगी विकासक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती म्हणून सक्षम प्राधिकारी किंवा त्याने यासंबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेली कोणतीही व्यक्ती, भागिदारी संस्था, कंपनी किंवा संयुक्त उपक्रम असा असेल, आणि त्यात या सर्वांचा समावेश असेल, आणि वित्त संस्था/कंपनी याचा अर्थ, यथास्थिती रिझर्व बँक ऑफ इंडिया किंवा कंपन्यांचे निबंधक यांनी अशाप्रकारे प्रमाणित केले आहे अशा संस्था किंवा कंपनी, असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अरविंद चौधरी,**
शासनाचे सह सचिव.

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 26th February 2004

## Order

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. MUDRANK. 2004/38/C.R. 68/M-1.—Whereas the Government of Maharashtra had issued an Order, Revenue and Forests Department, No. MUDRANK. 2003/742/C.R. 317/M-1, dated 31st October 2003, in exercise of the powers conferred by clause (a) ofsection 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958) (hereinafter referred to as 'the said Act",) and thereby remitted the stamp duty chargeable under the said Act, on instrument of Agreement [ Article 5 *(h)*], development Agreement [ Article 5 *(g-a)*], Joint Venture Agreement [Article 47], Power of Attorney [Article 48 *(a)* to *(b)*], and Power of Attorney given for development [ Article 48 *(g)*], in Scheduled-1 appended to the said Act, to be executed between the Maharashtra industrial Development Corporation and a private developer, under the policy known as Development of industrial Parts through Private Sector Participation ;

And Whereas the Government of Maharashtra considers it expedient to further allow such remission os stamp duty with certain modifications ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the said Act, the Government of Maharahtra, being satisfied that it is necessary so to do in the public interest, hereby remits the stamp duty chargeable also on the instruments of Lease (Article 36), Leave and Licence Agreement [Article 36(a)], and Transfer of Lease/Assignment Lease/ (Article 60), in the Schedule-l appended to the said Ad, to be executed between the Maharashtra Industrial Development Corporation and a private developer, Under the policy known as the Development of Industrial Parks through Private Sector Participation, and also the instruments of Mortgaged Deed (Article 40 of the said schedule), executed between the Joint Venture Company and the Banks/Financial Institutions.

Explanation. — For the purpose of these order, "private developer" shall mean and include any person, Firm, Institute, Company or a Joint Venture Company who has been allotted the work of development of the Industrial

Part and who has been certified by the Competent Authority or any Officer authorised by it in this behalf, as a private developer, appointed by the Maharashtra Industrial Development Corporation, and Financial Institution/ Company means an Institution or a Company certified as such institution or Company by the Reserve Bank of India or the Registrar of Companies, as the case may be.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARVIND CHOUDHARI,

Joint Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई